**परभणी जिल्हयाचे विभाजन होऊन परभणी व हिंगोली अशा दोन जिल्हयांची निर्मिती करण्यात आल्यांनतर त्याअंतर्गत कार्यरत असलेल्या पाणी पुरवठा उप विभागाचे विभाजन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००१/प्र.क्र.१७५/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांकः- ९ जूलै २००३.**

**वाचा :-** १) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१०९३/प्र.क्र.८१९/ पापु. ०७ दिनांक ६ मार्च, १९९७.
२) शासन अधिसूचना , महसूल व वन विभाग क्र. पुर्नरचना ४०९७/३६७/सी.आर.७१/म-१० दि. २४ एप्रिल, १९९९
३) शासन अधिसूचना ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए १०९९/सी-आर७२ (१)/०५, दि. २४ एप्रिल, १९९९
४) मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्र. ग्रापापू- विजिपप/कक्ष अधि/११२३/२००३ दि. १३.५.२००३.

**प्रस्तावना :-**

संदर्भिय क्र. २ येथील दि. २४ .४.१९९९ च्या अधिसूचनेव्दारे परभणी या महसूली जिल्हयाचे विभाजन करुन हिंगोली या नविन महसूल जिल्हयांची निर्मिती करण्यात येऊन तो दिनांक १ मे, १९९९ पासून स्वंतत्रपणे अस्तित्वात आला आहे. संदर्भिय क्र. ३ येथील दि. २४/४/९९ च्या अधिसूचनेव्दारे हिंगोली या नवीन जिल्हयाकरीता जिल्हा परिषद स्थापित करण्यात आलेली आहे. त्यापरिणामी जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत या विभागाच्या अधिपत्याखालील पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी कार्यान्वित असलेल्या उप विभागाची विभागणी परभणी व हिंगोली या जिल्हयामध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी विचारात घेता, या विभागाच्या अधिपत्याखाली, परभणी जिल्हा परिषदेला संदर्भिय क्रमांक १ येथील दिनांक ६ मार्च, १९९७ च्या शासन निर्णयान्वये पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी देण्यात आलेल्या दोन उप विभागांपैकी एक उपविभाग (कळमनूरी), त्या उप विभागातील अधिकारी व कर्मचारी, कामकाजाचा कार्यभार, फर्निचर, लेखन सामग्री, वाहने इत्यादीसह जसेच्या तसे हिंगोली या जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यास शासन या आदेशान्वये मंजूरी देत आहे.

२. हिंगोली जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आलेल्या उप विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्यासाठी सन २००३-२००४ या आर्थिक वर्षापासून पुढे नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल व ते त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावे.



५६३

**अ) राजपत्रित अधिकारी वर्गासाठी :** २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता -०१ पाणी पुरवठा -००१, संचालक व प्रशासन-(०१) (०१) पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणी साठी विभागीय /उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३)"

**ब) अराजपत्रित कर्मचा-यांसाठी :** २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता-१९१-स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादींना सहाय्य महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषंदाना आस्थापना अनुदाने (स्थानिक क्षेत्र) (०१) (०५) नियमित आस्थापना (२२१५१८८१), ४१ सहाय्य अनुदान

३. उपरोक्त उपविभाग वर्ग करण्याची कार्यवाही तत्काळ पूर्ण करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**(सुधाकर ज्ञा. बोबडे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,
विभागीय आयुक्त
सदस्य सचिव , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
जिल्हाधिकारी परभणी , हिंगोली
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी, हिंगोली
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र- २ नागपूर (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता)
जिल्हा कोषागार अधिकारी परभणी, हिंगोली
मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा नवी मुंबई,
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद,
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, परभणी, हिंगोली
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी परभणी, हिंगोली
कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण परभणी, हिंगोली
कार्यकारी अभियंता , ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद परभणी, हिंगोली
संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद
जिल्हा वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा परभणी, हिंगोली
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद परभणी, हिंगोली
जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी परभणी, हिंगोली
ग्राम विकास विभाग, मंत्रालय , मुंबई
विभागातील पर्यवेक्षकीय अधिकारी व सर्व कार्यासने.
निवडनस्ती पापु ०७ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.



५६४